सं.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार -वि- पंढरी
निशाणी क्र. ७८



**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ११ विजय चंद्रपालजी गंगावने यांचा पुढील सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

**०६.** दि. २१.०३.२०२५ रोजी पंढरी कुंभरे याचा बयाण घेतला होता. त्याने सांगितले की, मी व माझा साथीदार उत्तम मेश्राम यांच्या सोबत जावून मी शिकार करतो. त्याच्या आधी त्याने त्याचा नाव व गावाचा पत्ता सांगितला. त्याने सांगितले की, तो सोनपूर गावात राहतो व त्याच्या सोबत किशोर भलावी, नंदू भलावी हे दोघे शिकारीकरिता त्याला मदत करतात. दि. १३.०३.२०२५ रोजीच्या रात्री ८.०० वाजता गजानन पाटील श्रीरामे यांच्या शेतात ११ केव्ही. विद्युत लाईनवर लाकडी खुंटयांच्या सहाय्याने सेंट्रींग तार याचा सापळा रचून शिकारीकरिता लावला होता. त्या शेतामध्ये असलेल्या झोपडीत थांबलेला असताना रात्री १०.०० ते ११.०० च्या दरम्यान लाईन ट्रीप झाल्याचे त्याला समजले. तो सापडयाजवळ गेला असता त्याला वन्य प्राणी डुक्कर मरण पावल्याचे दिसले. तो त्या झोपडीमध्ये रात्रभर राहिला. दुस-या दिवशी सकाळी तो नंदू भलावीच्या घरी गेला. त्यांच्या सोबत उत्तम मेश्राम होता. त्याला घटनेबद्दल माहिती दिली. त्याने नंदू व उत्तमला सोबत चलून डुक्कराचे तुकडे करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी नंदूच्या फोनवरून किशोर भलावीला माहिती दिली व त्याला गजानन श्रीरामे याच्या शेतात येण्यास सांगितले. नंदू गेला नाही. पंढरी उत्तमला घेवून शिकारीच्या ठिकाणी गेला. पंढरी व उत्तमने सकाळी १०.०० च्या दरम्यान शिकारचे तुकडे केले आणि प्लास्टीकच्या गोणीमध्ये ठेवले. किशोर आल्यानंतर पंढरी व किशोर एका मोटर सायकलवर सर्रा मार्गे विटा भट्टीवर गेले. त्यांचे नेहमीचे ग्रिहाईक छेदीराम ठाकूर त्याला भेटले. त्याला ते मटण दिले व रू. २०००/- मध्ये सौदा झाला. अंदाजे २० किलो मटन होते. त्याबदल्यात त्यांनी रू. १५०/- दिले. बाकी पैसे उद्या देतो असे सांगितले. दुस-या दिवशी रू. ५००/- परत घेवून आला. दि. १९.०३.२०२५ रोजी दिलेले साहित्य तेच आहे असे त्यांनी सांगितले. मला सदरचा बयाण

दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ९४** देण्यात येते.

**०७.** त्याच दिवशी किशोर भलावी याने बयाण दिले. पंढरी व उत्तम हे नेहमी वन्य प्राण्याचे शिकार करतात. त्याने तो राहणारा चौरखैरी येथील असल्याचे सांगितले. दि. १४.०३.२०२५ रोजी नंदूचा फोनवरून किशोरला फोन आला. पंढरी फोनवरून बोलत होता. त्याने रात्री केलेल्या डुक्कराच्या शिकारीबद्दल सांगितले. त्याला सांगण्यात आले की, गजानन पाटील श्रीरामे यांच्या शेतात पोहोच. तो तिथे गेला असता प्लास्टीकच्या गोणीमध्ये २० किलो मटन लपवले होते. ते मटन घेवून पंढरी व किशोर भलावी सर्रा मार्गे विट भट्ट्यावर पोहचले. छेदिराम ठाकूर याला मटन दिले. रू. २०००/- देवू केले होते. त्याच्याकडे रू. १५०/- असल्याने रू. १५०/- दिले. बाकी पैसे उद्या देतो असे सांगितले. याबदल्यात तो त्याला दारू पाजतो व गाडीत पेट्रोल टाकून देतो. हे झाल्यानंतर आम्ही नंदूच्या घरी जावून मटन शिजवून खात असतो. या आधीच्या पंचनाम्यामध्ये त्याने जागा दाखवल्या होत्या. मला सदरचा बयाण दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ९५** देण्यात येते.

**०८.** त्यानंतर नंदू भलावीचा बयाण घेण्यात आला. त्याने सांगितले की, पंढरी माझा मित्र आहे. मी त्याला खूप वर्षापासून ओळखतो. दि. १४.०३.२०२५ रोजी पंढरी माझ्या घरी आला असता मी व उत्तम आम्ही दोघे घरी होतो. आदल्यादिवशी शिकारीबद्दल मला पूर्ण माहिती सांगितली. त्याने मला व उत्तमला मदतसाठी चला असे म्हटले. मला बाहेर जायचे असल्याने मी येणार नाही असे सांगितले. नंदूने आपल्या फोनवरून किशोर भलावीला माहिती दिली पंढरी म्हणाला की, गजानन श्रीरामेच्या शेतामध्ये ये. त्यानंतर उत्तम व पंढरी हे दोघे निघून गेले. पंढरी हा नेहमी वन्य प्राण्याचे शिकार करतो. तो ११ केव्ही. विद्युत लाईन लावून शिकार करतो. त्यानंतर माझ्या घरी येवून आम्ही तिघ मटन शिजवून खातो. जेव्हा

नंदू घरी आला तेव्हा दोघांनी मटन शिजवून खाल्ले. मला सदरचा बयाण दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ९६** देण्यात येते.

**०९.** त्यानंतर छेदिरामने बयाण दिले. त्याने सांगितले की, मी पंढरी व नंदू भलावी यांना ओळखतो. हे नेहमी वन्या प्राण्यांची शिकार करतात. दि. १४.०३.२०२५ रोजी दुपारी विट भट्ट्यावर पंढरी व किशोर भलावी प्लास्टीकच्या गोणीमध्ये वन्य प्राणी डुक्कराची शिकार अंदाजे २० किलो माझ्याकडे घेवून आले. त्या बदल्यात रू. २०००/- द्यायचे कबूल केले. छेदिलाल कडे रू. १५०/- असल्याने त्याने रू. १५०/- दिले. दुस-या दिवशी बाकी पैसे द्यायचे ठरले. मला सदरचा बयाण दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ९७** देण्यात येते.

**न्यायालयाची मध्यांतराची वेळ झाल्याने पुढील सरतपास दुस-या सत्राकरिता तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.27 16:38:34 +0530

सावनेर,
दिनांक २७.०४.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ११ विजय चंद्रपालजी गंगावने यांचा पुढील सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत</u>**

**१०.** मेळघाट टायगर सेल यांच्याकडून घटनास्थळी १ कि.मी.च्या परिसरात जे नंबर ॲक्टीव होते त्यांचा डम डेटा मागवला होता. त्यामध्ये आम्हाला दोन संशयीत नंबर भेटले. ते रात्री ३.०० ते ६.०० च्या दरम्यान ॲक्टीव होते. त्यामधील एक मुन्ना धुर्वे, रा.

टेकाडी व दुसरा सिलू नावाचा व्यक्तीचा होता. चौकशी करण्याकरिता आम्ही टेकाडी येथे मुन्ना धुर्वेकडे गेलो. तो म्हणाला की, सदरचा नंबर त्याचा मुलगा वापरतो. त्याचे नाव विजय होते. त्यानंतर आम्ही त्याच्या घरी गेलो. विजयने सांगितले की, तो त्याच्या मैत्रीणसोबत बोलत होता. त्याची खात्री पटल्याने आम्ही परत आलो. तसा मौक्का पंचनामा केला. मला मौक्का पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र. ५० वर आहे.

**११.** दि. २२.०३.२०२५ रोजी मी गजानन बाजनघाटे, रा. सिरोंजी याचे बयाण घेतले. त्याने सांगितले की, दि. १४.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शेतीच्या कामानिमित्त तो त्याच्या शेताकडे गेला होता. शेताचे काम झाल्यानंतर तो बैलाला पाणी पाजण्याकरिता भानगळा नाल्याजवळ गेला असता पुढे बैल असताना अचानक बैल घाबरला. त्याला संशय आला त्यामुळे त्याने स्वत: जावून पाहिले. तेव्हा त्याला दिसले की, तिथे एक वाघ पडून दिसला. तो घरी पळत आला. सदरची घटना त्याने त्याचा मुलगा शुभम व पोलीस पाटीलला सांगितली. त्याने सांगितले की विद्युत खांब त्याच्या शेतात नसून जल विभागाकडे येते. मला सदरचा बयाण दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ९८** देण्यात येते.

**१२.** दि. २२.०३.२०२५ रोजी दुपारी नंदू भलावी, रा. सोनपूर, किशोर भलावी, रा. चौरखैरी, छेदिराम ठाकूर यांनी कबूली दिली की, त्यामध्ये त्यांनी पंचांसमक्ष त्यांनी गुन्हयाची कबूली दिली. कबूली जबाब नि.क्र. ५३ वर आहे. त्याप्रमाणे मेमोरेंडम पंचनामा केला व तो नि.क्र. २७ वर आहे. किशोर भलावी याने आमचे वाहन चौरखैरी येथील त्याच्या घरी नेण्यास सांगितले. त्याने त्याचे घर दाखवले. गुन्हयात वापरलेली मोटर सायकल त्याच्या घरापासून १०० मिटर अंतरावर होती. ती मोटर सायकल जप्त केली. तसा पंचनामा केला. त्याच्या घरी काही सापडले नाही. नंदू भलावीने सांगितल्या प्रमाणे वाहन सोनपूर येथे

वळवले. त्याने त्याचे घर दाखवले. घरी पत्नी व मुलगी होती. त्याच्या घराची झडती घेतली. घरात काही आढळले नाही. त्याच्या घराच्या वरती खोली होती. त्या खोलीमध्ये उत्तम मेश्राम राहतो असे त्याने सांगितले. नंदू भलावीला घेवून आम्ही वरती गेलो. त्याच्या घराला कडी लावली होती. नंदूने कडी काढल्यावर आम्ही आत गेलो. तेथे पांढ-या कपडयात बांधलेल्या दोन सु-या दिसल्या. त्या सु-या मला दाखवण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्या एम.ओ.क्र. १३ वर आहे. सदरच्या सु-या जप्त केल्या. त्याचा पंचनामा केला. छेदिराम ठाकूर याने आम्हाला सर्रा मार्गे विट भट्टीवर येण्यास सांगितले. तेथे राहत असलेली झोपडी त्याने दाखवली. तेथे शोध घेतला असता काही मिळाले नाही. पंढरी व किशोर भलावी यांनी मटन आणून दिलेल्याची जागा त्याने दाखवली. त्यानंतर वाहन परत सोनपूर गावाकडे आल्यानंतर गजानन पाटील श्रीरामे यांच्या शेताजवळ वाहन थांबवण्यास सांगितले. त्या ठिकाणी पंढरी कुंभरे व उत्तम मेश्राम यांनी रान डुक्कराची शिकार करून मटन लपवल्याची जागा किशोर भलावीने दाखवली. त्यानंतर परत खापा येथे आलो.

**१३.** दि. २३.०३.२०२५ रोजी सकाळी माणिक सिलू व राजू दरसमा, रा. तोरणी यांच्या मधील माणिक सिलू याने सांगितले की, मी, वसंता बन, संजय सिलू व राजू दरसमा हे एम.पी.ला लागून असलेल्या महाराष्ट्रातील शेतामध्ये व जंगलामध्ये जावून लाकडी खुंटयाच्या सहाय्याने लोखंडी तारेचा सापळा रचून ११ केव्ही. विद्युत लाईनवर करंट लावून वन्य प्राण्यांची शिकार करतो. वसंता बन आमचा लिडर आहे. तो जे आम्हाला सांगेल तसे आम्ही करत असतो. राजू सिलूने पण असेच सांगितले. सदरचा कबूली जबाब नि.क्र. ५४ वर आहे. आम्ही श्वान पथक सहीत तोरणी येथे जाण्यास बडेगाव मार्गे तयार झालो. त्याआधी आम्ही खमारपाणी व बिछवा येथील पोलीस कर्मचारींना कॉन्ट्याक्ट केला व त्यांना खमारपाणी येथील पोलीस चौकीत येण्यास सांगितले. आम्ही आमच्या तीन गाडयांनी बडेगाव मार्गे आरोपींनी सांगितल्याप्रमाणे निघालो. दुपारी २.३० वाजता आम्ही खमारपाणी

येथे पोहोचलो. तेथील पोलीस निरिक्षक डोगरा यांना जावून भेटलो. ते व सोबत ४ कर्मचारी असे त्यांना घेवून बिछवा येथील पोलीस स्टेशनला गेलो. तेथील ठाणेदार श्री. मरस्कोल्हे यांची भेट घेतली. ते पण सोबत आले. तेथून आम्ही तोरणीला पोहचलो. तेथे माणिकने स्वत:चे, वसंता बन व संजय सिलू यांचे घर दाखवले. वसंता बन व संजय सिलूच्या घराला लॉक लागले होते. तेथील लोकांनी सांगितले की, होळीच्या दिवसापासून ते फरार आहेत. त्यानंतर माणिकने स्वत:चे घर दाखवले. श्वान पथक घेवून त्यांच्या घराची चौकशी केली असता त्याच्या घरामध्ये प्लास्टीक कोटेड एक ताराचा बंडल मिळून आला. त्याबद्दल त्याला विचारले असता त्याने सांगितले की, ११ केव्ही. विद्युत लाईनवर करंट लावण्याकरिता या तारेचा वापर होतो. मला सदरची वायर दाखवण्यात आली. ती तीच आहे. ती एम.ओ. क्र. ९ वर आहे. त्याप्रमाणे ते जप्त करून जप्ती पंचनामा केला. त्यानंतर राजू दरसमा याने त्याचे घर दाखवले. त्याच्या घराला कडी लावली होती. त्याने घराची कडी काढली. घराची चौकशी केली असता घरी काही दिसून आले नाही. त्यानंतर आम्ही परत खापा येथे येण्यास निघालो. त्याप्रमाणे पंचनामा केला. तो नि.क्र. २८ वर आहे.

**१४.** आम्ही सिरोंजी येथे भनगळा नाल्याजवळ गाडी थांबवली. माणिक व राजू दरसमा याला घटनास्थळी घेवून गेलो. तेव्हा त्यांनी आधी नकार दिला त्यानंतर तयारी दाखवली. घटनास्थळी नेवून त्यांना विचारले असता ते म्हणाले की, वसंता बन याला विचारा. तोच सगळ सांगू शकतो. असे बोलून माहिती देण्यास नकार दिला. त्याच दिवशी आम्ही परत आलो. सदरचे बयाण दि. २३.०३.२०२५ रोजी घेतले. माणिक याने सांगितले की, राजू दरसमा हा माझा मानलेला साळा आहे. मी, वसंता बन, संजय सिलू व राजू एम.पी.ला लागून असलेल्या महाराष्ट्रा जंगलामध्ये व शेतामध्ये येवून वन्या प्राण्याची शिकार करतो व त्याचे ४ समान तुकडे करून परत गावाकडे विकतो. राजूने पण सारखाच बयाण

दिला. त्याप्रमाणे बयाण नोंदवले. ते मला दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनु. **निशाणी क्र. ९९ व १००** देण्यात येते.

**वाघाशी संबंधीत वैद्यकीय कागदपत्रे दाखल करण्याकरिता सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE

Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.27 16:38:39 +0530

सावनेर,
दिनांक २७.०४.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

सं.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार -वि- पंढरी
निशाणी क्र. ७८

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe